क्रमांक : १२९५४ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : १८ सप्टेंबर, २०२०

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र:वशिअ-११२०/प्र.क्र.२७/११, दि.११ मे, २०२०

२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.८३७६/क-१, दिनांक ४ जून, २०२०

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र:वशिअ-११२०/प्र.क्र.२७/११, दि.९ सप्टेंबर, २०२०

**:: <u>परिपत्रक</u> ::**

राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी दरवर्षी दिनांक ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन दिनांक ३१ मे पर्यंत द्यावयाची मत्ता व दायित्वाची नियतकालिक विवरणे सादर करण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा आणि सेवेत प्रथम नियुक्त झालेले अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेच्या स्थितीस अनुसरुन द्यावयाचे मत्ता-दायित्व विवरणपत्राची कालमर्यादा या वर्षापुरती एक विशेष बाब म्हणून शिथिल करण्यात येवून राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी माहे मार्च, २०२० च्या स्थितीस अनुसरुन त्यांचे मत्ता व दायित्वाचे विवरण विहित प्राधिकरणास दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजीपर्यंत सादर करण्याबाबत दिनांक ११ मे, २०२० रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले होते.

आता लॉकडाऊन नंतर mission begin again अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यात आले असले तरी अद्यापही त्यावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. हि एकंदर परिस्थिती विचारात घेऊन सदर शासन निर्णयान्वये आता मत्ता व दायित्वाचे विवरण सादर करण्याकरीता दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत वाढविलेली कालमर्यादा पुढे दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत वाढविण्यात आली आहे.

**उपरोक्त नमूद शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून) यांनी दिनांक ३१ मार्च, २०२० च्या स्थितीस अनुसरुन मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र विहित प्रपत्रात दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत आस्थापना कक्षास सादर करावे.**

आदेशानुसार,

**( ऋतुराज ज. कुडतरकर)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
३) मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून)
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी
६) निवडसूची
७) संगणक कक्ष